# कथाकार बी. रघुनाथ

**प्रा.नरेंद्र ईश्वर घरत श्री बिंझाणी नगर महाविद्यालय उमरेड रोड, नागपूर.००९**

........................................................................................................................................................................

कथा गद्य कथात्म साहित्याचा स्फुट प्रकार. गोष्ट सांगणे व ऐकणे ही मानवी प्रवृत्ती आहे. गोष्ट सांगण्याच्या प्रवृत्तीतून कहाणीचा जन्म झाला. काऊचिऊच्या गोष्टीपासून, जातक कथेच्या आविर्भावातून, कहाणीच्या प्रसन्नतेतून आणि चक्रधरस्वामींच्या शिकवणुकीतून तसेच लोककथेच्या प्रसन्न वाहणाऱ्या झुळझुळीतून मराठी कथा संपन्न झाली आणि कहाणीपासून लघुकथेपर्यंत या कथनपर वाङ्मयप्रकाराने निरनिराळे रूपविशेष धारण केले. मराठी कथा हा साहित्यप्रकार कहाणी, गोष्ट, लघुकथा, नवकथा असा विकसित झालेला आहे. मराठी कथेचा विचार करतांना प्रामुख्याने करमणूक कालखंड (इ.स.१८९० ते इ.स.१९१५), मनोरंजन कालखंड ( इ.स. १९१५ ते इ.स. १९२५), यशवंत—किर्लोस्कर कालखंड(इ.स. १९२६ ते इ.स. १९४५) हे कालखंड विचारात घ्यावे लागतात.करमणूक कालखंडात हरिभाऊ आपटे, दिवाकर कृष्ण, कृ.के.गोखले,ना.के.बेहरे, वा.गो.आपटे यांच्याबरोबरच काशीताई कानेटकर,आनंदीबाई शिर्के इ. स्त्री लेखिकाही कथा लेखन करीत होत्या. मनोरंजन कालखंडात वि.सी.गुर्जर,कृ.के.गोखले, न.चि. केळकर, शि.म. परांजपे, वा.म. जोशी इ. कथालेखक लेखन करीत होते. तर यशवंत—किर्लोस्कर कालखंडात ना.सी.फडके,वि.स. खांडेकर, य.गो.जोशी, वि.वि. बोकील, द.र. कवठेकर, साने गुरूजी, ग.ल. ठोकळ, श्री. म. माटे, वरेरकर, शिरूरकर इ. लेखन महत्त्वपूर्ण मानले जाते.

मराठीच्या प्रारंभकाळातील कथा ही स्वप्नरंजनपर, वाचकांना कथानकातला सर्व तपशील सादर करणारी, संथ व पाल्हाळीक निवेदनाची, बोध देण्याच्या उद्देशाने लिहिलेली हरिभाऊंची कथा तंत्राच्या दृष्टीने फारशी जाणीव ठेवून लिहिली गेलेली नव्हती असे असेल तरी हरिभाऊंनी मराठी कथा वाङ्मय आपल्या प्रभावी लेखणीतून साकार करण्याचा त्यांचा प्रयत्न म्हणजे कथेची तत्कालीन कालखंडातील चांगली सुरूवात होती. त्याच कालखंडात ना. सी. फडके, वि.स. खांडेकर यांनी कथेला नवे तंत्र दिले. कलावादाच्या नावाखाली तंत्राची चौकट उभी करून कथेच्या विषयात विविधता आणली. परंतु कथा ही स्वप्नरंजनातच वावरत होती. या काळात जीवनदर्शनाऐवजी तंत्राच्या बडेजाव मांडल्याने कथा निर्जिव वाटू लागल्याचे हया काळात कथेवरून स्पष्ट होते. या फडकेप्रणीत तंत्राच्या बडेजावातून कथेला मुक्त करण्याचा प्रयत्न श्री.म.माटे, य.गो.जोशी, विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे, वामन चोरघडे आणि बी. रघुनाथ यांनी केला.

**बी. रघुनाथांचा जीवन परिचय :—**मराठवाडा अनेक संत,साहित्यिक, कवी यांची जन्मभूमी. मराठवाडा हा एक महाराष्ट्राचा भाग या भूप्रदेशात औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली व नांदेड या जिल्हयांचा समावेश होतो. याच मराठवाडयात प्रमत्त प्रतिभेचा धनी असलेला एक कवी आणि प्रखर वास्तवाला थेट भिडणारा एक कथाकार, आत्ममग्नतेला शब्दमुखर करणारा एक ललित लेखक, प्रचंड सामर्थ्य असलेला कादंबरीकार म्हणजेच बी.रघुनाथ उर्फ भगवान रघुनाथ कुलकर्णी यांचा जन्म **१५ आगस्ट १९१३ रोजी**परभणी जिल्हयातील **'सातोना'** या गावी कनिष्ठ मध्यमवर्गात झाला. समकालीन मित्रांत ते **'बी. आर'** आणि साहित्यक्षेत्रात **'बी. रघुनाथ'** म्हणून ओळखले जातं. कथा, कविता, कादंबरी आणि गुणवता यांचा अपूर्व मेळ साधणारी त्यांची लेखणी मराठी साहित्यात **'मराठवाडी लेणे'** म्हणून लौकिक मिळवून गेली.

बी. रघुनाथांचे लौकिक जीवन अगदीच सामान्य होते. घरी थोडीफार शेती. त्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. बी. रघुनाथ १४ वर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अशा अवस्थेत एका हैदराबादी नातेवाईकांकडे राहून मोठया कष्टाने शालेय शिक्षण पूर्ण केले. **१९३१** मध्ये ते मॅट्रिक झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेणे त्यांना परवडणारे नसल्यामुळे मॅट्रिक होताच त्यांनी इ.स. **१९३२** साली हैद्राबाद संस्थानच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात परभणी येथे 'टेंपररी मिस्त्री' म्हणून अवघ्या २०रू. मासिक पगारावर नोकरीस प्रारंभ केला. पुढे कनिष्ठ लिपिक म्हणूनच आयुष्यभर खर्डेघासी केली. दुर्देव असे की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आयुष्य जगतांना त्याच कार्यालयात **७ सप्टेंबर १९५३** साली हृदयक्रिया बंद पडून त्यांचा मृत्यू झाला. अवघे ४० वर्षाचे आयुष्य लाभलेल्या बी. रघुनाथांनी मराठी साहित्यविश्वात आपले वैशिष्टयपूर्ण लेखन करून स्वत:चा ठसा उमटविला.

**बी. रघुनाथांची साहित्यसंपदा—**

| | | |
|---|---|---|
| **अ) कविता संग्रह** :— | १) आलाप आणि विलाप (१९४१) | २) पुन्हा नभाच्या लाल कडा (१९५५) |
| **ब) कादंबऱ्या** :— | १) ओ`  (१९३६) | २) हिरवे गुलाब (१९४३) |
| | ३) बाबू दडके (१९४४) | ४) उत्पात (१९४५) |
| | ५) म्हणे लढाई संपली (१९४६) | ६) जगाला कळलं पाहिजे (१९४९) |
| | ७) आडगावचे चौधरी (१९५४) (मरणोत्तर) | |
| **क) ललित लेखनसंग्रह** :— | १) अकलेचे प्रवासी (१९४५) | |
| **ड) कथासंग्रह** :— | १) साकी (१९४०) | २) फकीराची कांबळी (१९४८) |
| | ३) छागल (१९५१) | ४) आकाश (१९५५) |
| | ५) काळी राधा (१९५६) | |

**कथाकार बी. रधुनाथांचा साहित्यप्रवास, तत्कालीन राजकीय—सामाजिक परिस्थिती व मराठी भाषेची स्थिती :—** ी. रघुनाथांचा साहित्यप्रवास कवितेने सुरू झाला.**'फुलारी'**या टोपण नावाने त्यांनी कविता लिहिल्या. वयाच्या १७व्या वर्षी पहिली कविता लिहिली नि कविता, कथा, कादंबरी, ललितनिबंध अशी चौफेर मुशाफिरी केली. कविता, कादंबरी हया वाङ्मयप्रकारातून त्यांनी लेखन केलेले असले तरी त्यांची ओळख कथाकार म्हणूनच आहे. स्वत:विषयी लिहितांना त्यांनीच म्हटले आहे—"मी एक कथालेखक आहे. कथाखेरीज मला वेगळा परिचय नाही." बी. रघुनाथ ज्या कालखंडात साहित्य लेखन करीत होते. तो काळ पारतंत्र्याचा, महाराष्ट्राच्या दृष्टीने धकाधकीचा होता. ते ज्या परिसरात वावरले तिथे कमालीचे अन्याय, अत्याचार चालू होते. कारण याच कालखंडात हैद्राबाद संस्थानात, मराठीचे केंद्र असलेल्या मराठवाडा परिसरात निजामी राजवट होती. निजामी राजवटीमुळे शिक्षणाचे व राज्यकारभाराचे माध्यम उर्दू होते. मराठी भाषेला फारसा वाव मिळत नव्हता, मराठी भाषेला कुठलेही स्थान नव्हते, स्वाभाविकच मराठी भाषा अंग चोरून वावरत होती आणि मराठी लेखन करणेही फार कठिण काम होते. अशा परिस्थितीत बी. रघुनाथांनी निजामी राजवटीत राहून,

त्या राजवटीच्या जुलमांचे चित्रण मराठी भाषेतून केले. नागनाथ कोतापल्ले बी. रघुनाथांचे कर्तृत्व मान्य करतांना म्हणतात, “हे वास्तव (संस्थानातील अन्याय,अत्याचार इ.) आणि या प्रदेशाला असंतोष प्रकट करीत असतांना हैद्राबाद संस्थानाचा रोष ओढवून घेण्याचा धोका होताच.........घरची परिस्थिती बेतास बेत,उपजिविका तृतीय श्रेणीच्या सरकारी नोरकरीवर. अशा परिस्थितीत त्यांनी केलेले लेखन म्हणजे आपले वैयक्तिक जीवनपणाला लावून केलेली एक बंडखोरीच ठरते”[१] त्याचप्रमाणे त्यांनी ज्यावेळेस कथालेखनाला सुरूवात केली तो काळ मराठी लघुकथेचा काळ होता. मराठी वाङ्मयामध्ये कथा तंत्रबध्द लिहीली जात होती, स्वप्नरंजानाचे युग होते, अंतरंगापेक्षा बाहयांगाला महत्व प्राप्त आले होते.याच काळात फडके—खांडेकर आपले लेखन करीत होते. स्वाभाविकच यांच्या लेखनाचा प्रभाव तत्कालीन लेखकांवर पडलेला होता. र.वा.दिघे, म.भा.भोसले, चि.य.मराठे,वामन चोरखडे, द.र.कवठेकर इ. ग्रामीण कथाकारांनी फडके प्रणीत निरगाठ, गुंतागुंत आणि उकल या पठडीतील कथा लिहीली. परंतु बी रघुनाथांनी तत्कालीन संकेताला झुंगारून स्वतंत्र वाट निर्माण केली. स्वप्नरंजनाच्या आहारी न जाता तत्कालीन समाजजीवनाचे वास्तवरूप कथेत मांडले. आपल्या कथालेखनाबद्दल ते लिहितात, “गोष्टीची सुरूवात, मध्य व शेवट या विषयावर माझा अभ्यास मुळीच नाही. मला चांगली वाटली तिच सुरूवात. जिथे कथा संपवावी वाटली तोच शेवट! भरून आलेलं मन रिकामं झाल्यासारखं वाटणार नाही तोवर पात्रांच्या प्रसंगाच्या किंवा दृश्यांच्या वर्णनाचा ओघ कां म्हणून थांबवावा.”[२] त्यांनी तंत्राला महत्वाचे स्थान न दिल्यामुळे पात्रांना कायम स्वातंत्र्य दिले. म्हणून त्यांची पात्रे विविध तऱ्हेची आणि मन:पूर्वक आहे. त्यात साचेबध्दपणा नाही. पात्रांच्या बरोबर त्याच्या जीवनदर्शनातही साचा नाही त्यामुळे त्या कालखंडात त्यांचे लेखन वैशिष्टयपूर्ण ठरते. रघुनाथांची पहिली कथा **‘कंदील’** पुण्याच्या प्रकाश साप्ताहिकात प्रकाशीत झाली. साधारणत: १९३५ ते १९५३ हा १८ वर्षाचा त्यांच्या कथालेखनाचा कालखंड त्यात स्वातंत्र्यपूर्व, निजामी राजवट ते स्वातंत्र्योत्तर जीवनापर्यंत सगळे तपशील त्यांच्या कथालेखनात आले आहेत. उघडया डोळयांनी जे जग पाहिले व अनुभवले तेच त्यांनी आपल्या कथेतून चितारले. कोणत्याही तंत्राचा, सूत्राचा उपयोग न करता जीवन आणि जीवनातील वास्तव हेच कथालेखनाचे मंत्र मानले.

**बी. रघुनाथांचे कथाविश्व :—**‘साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते’ असे नेहमीच बोलले जाते. बी रघुनाथ यांच्या कथांच्या बाबतीत हे वक्तव्य अगदी तंतोतंत लागू पडते. त्यांच्या **साकी,फकिराची कांबळी,छागल,आकाश आणि काळी राधा** या पाच कथासंग्रहातील ५९ कथांमधून सर्वसामान्य आयुष्याचे वास्तवादी चित्रण पहावयास मिळते. रस्त्यावरील टांगेवाले, भिकारी, फकीर, घरगडी, शिपायांपासून समाजातील प्रतिष्ठित अमीर उमराव, सरदार, सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत तसेच तसेच उपेक्षीत वेश्यांपासून कुलीन,घरंदाज स्त्रियांपर्यंत या साऱ्यांचे चित्रण त्याच्या एकूण कथांमधून पहावयास मिळते. **‘नागझरीचे पाटील’** या कथेत कुटुंबातील पुरुषाचा असणारा बाहेरख्यालीपणा आला असून पती—पत्नीच्या नात्यावर होणारा परिणाम प्रतिबिंब झाला आहे.गावात कोल्हाटीने येणे व त्याच्या घरातील पत्नीवर होणारा परिणाम व तिची मानसिकता या बरोबर रोहित्याचे अत्याचार, त्यांची शोषण करणारी सावकारी आाणि याला पाठिंबा देणारी निजामी राजवटीचे वास्तव चित्रण त्यांनी या कथेतून केले आहे. **‘एक हंगामी जागा’** आणि **‘गंगाधर’** या सारख्या कथांमधून कारकूनी जीवनाची ओढाताण,कारकुनाची पापभिरु वृत्ती आणि त्यांचे दारिद्रय हे विदारक सत्य मांडले. निजामी जुलमी राजवट आणि या जुलुमाखाली दबत जाणारी गरीब माणसं, यातून बनलेली त्यांची मानसिकता,संवेदना,द:ख यांच्या चित्रणाबरोबरच मुस्लिम सत्ताधाऱ्यांचा मग्रुरपणा, ताणतणाच,गरीब जनतेचा सावकरांनी घेतलेला फायदा. तर **‘जनता लिंबे टाकली’** या कथेत लोकशाही आल्यानंतर एका गावामध्ये ठगे लोक एका चांगल्या शिक्षकाचं आणि तेही अगदी कायदेशीर पध्दतानं, नियामांना धरून, याच चित्रणं येतं. समाजाचे रक्षक असलेले पोलीस स्त्रियांचे भक्षक कसे बनतात हे **‘पारधी आणि पाखरू’** या कथेत चित्रित केले आहे. महागाई, काळाबाजार, भ्रष्टाचार वाढला. सामान्य जनता या धक्क्याने भांबावून गेली. नोकरर्गाचे हाल होऊ लागले. यातूनच कृत्रिम अन्नटंचाई निर्माण झाली. अन्नपुरवठा न झाल्यामुळे पांढरपेशांच्या घरातही लहान मुलांच्या इच्छाही पुरवणेही अवघड झाले. उदा.**‘किशी’** ही कथा. एकंदरीत कथेतून प्रकट होणारे जग अशा विविधस्तरावरचे आहे. ते अनागर आहे. हे कष्टकऱ्यांचे आणि श्रमिकांचे जग आहे. या संदर्भात भगवंत देशमुख म्हणतात, “निजामी राजवटीतील मराठवाडयाच्या जीवनातील विविध थरांचे व त्यात वावरणाऱ्या व्यक्तीचे मोठे मर्मभेदक चित्रण त्यांनी केले आहे. एका अर्थाने मराठीत खरी प्रादेशिक कथा प्रथम बी रघुनाथंनी निर्माण केली म्हणावे लागेल”[३] अन्याय, अत्याचार, सूड आणि दारिद्रय यांचे चित्रण करीत असतांना त्यांच्या कथेतून येणारी स्त्री सुध्दा तेवढीच प्रभावी व केंद्रस्थानी आहे. एवढेच नाही तर स्त्रीच्या मनाची घालमेल, तिच्या भावना व त्याचा होणारा कोंडमारा अगदी समर्थपणे चित्रित करतात.**‘हे हाडामासाचं शरीरं’** या कथेत कामभावनेच्या उद्रेक स्वरूपाचे चित्रण दिसून येते. या कथेतील ‘चंचलू’ हा गवंडी व ‘गुणी’ ही दारूडया नवऱ्याची बायको या दोहोंमधील गुंतागुंत उकलत जाणारी कथा. **‘निरूध्द जीवन’** या कथेतील ममता; पिराजी या मराठी मजूराची पत्नी. पिराजीच्या घरातील संसार तिला नकोसा वाटत होता. अशातच ती पोलीस खात्यात जमादार असलेल्या रहिमच्या प्रेमात पडते व ममता मुमताज होते. रहिम दारू पिऊन मुमताजला मारतो, तिच्या अंगाचे लचके तोडतो. हे सगळे निमुटपणे ती सहन करते कारण तिच्याकडे दुसरा पर्याय नसतो. निजामकालीन स्त्रीकडे पाहण्याची भोगवादी वृत्ती इथे स्पष्ट होते. **‘काळी राधा’** या कथेतून समींदर आपल्याच लेकीला वेशा व्यवसाय करायला भाग पाडते. राधा ही दिसायला काळी असली तरी ती सुंदर होती. शेजारच्या रंगनाथ बरोबर ती संसाराची स्वप्ने पाहते परंतु आई आपल्या स्वार्थाकरिता वेश्या व्यवसायात अडकवून ठेवते. हे विदारक सत्य चित्रित करतात.यात परिस्थितीला शरण जाणे ही राधाची अवस्था असते. कस्तुरी ही स्त्री गावातील अनेकांना फसवते, लुबाडते, कंगाल करते आणि शेवटी तिला साऱ्यांचा कंटाळा येतो. ती चांगले जगण्याचा प्रयत्न करते परंतु समाज तिचेपुर्वायुष्य विसरू देत नाही. हे **‘मुरळी’**या कथेतील वास्वव तर **‘आकाश’** या कथेत स्त्रीच्या उदात्त रूपाचे दर्शन घडवितात. स्त्रीला व्यापक, धीरगंभीर व सर्वव्यापी अशा आकाशाची उपमा देतात. **‘लंगडयाची दौलत’** मध्ये गोरीबी लंगडया शेखलाल बरोबर लग्न करते परंतु नवऱ्याच्या साहेबांसोबत तिचे लगट असते. **‘आभावती’** या कथेत शाम आणि आभावती यांच्या प्रेमविषयक भावनेचे चित्रण केलेले दिसते. एकूणच त्यांच्या स्त्री कथात बदफैली करून लोकांना लुबाडणाऱ्या, व्याभिचारी, प्रणयाचे उघडपणे प्रदर्शन घडविणाऱ्या अशा विविध मनोवृत्तीचे दर्शन घडविणाऱ्या, विविध स्तरांतील स्त्रिया भेटतात तशाच व्यापक सहानुभाव असणाऱ्या आकाशा एवढया मनाच्या सत्शील स्त्रियांचे चित्रणही येते.बी. रघुनाथांच्या कथेतील स्त्री चित्रणाविषयी प्रभा गाणोरकर म्हणतात,“ बी. रघुनाथांनी आपल्या कथांतून केलेले हे स्त्रीचित्रण अत्यंत वास्तव तर आहेच पण तत्कालीन कथावाङ्मयातील स्त्रीचित्रणाच्या तुलनेत ते अत्यंत असांकेतिकही आहे. शहरी मध्यमवर्गीय संवेदनशीलतेने केलेले स्त्रीचित्रण किंवा ग्रामीण सौदर्यवादी अंगाने करण्यात आलेले

स्त्रीचित्रण मराठी कथेमध्ये रूढ असतांना बी. रघुनाथांनी कथांतून साकार केलेल्या स्त्रियांच्या चित्रणाला असलेली प्रखर वास्तववादी धार आपल्याला चमकावून टाकणारी आहे.”

**निष्कर्ष :—**

१) तत्कालीन रूढी, प्रथा व परंपरेचे चित्रण त्यांच्या कथेतून प्रकट झाले आहेत.

२) निजामी समाजव्यस्थेतील वास्तवाचे मनोवेधक चित्रण आढळते.

३) बी. रघुनाथांनी मराठी नवकथेची पायवाट तयार केली असे दिसते.

४) त्यांच्या बहुतेक कथांत स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे दर्शन घडते.

५) बी. रघुनाथांनी माणसांच्या अंतर्मनाचे दर्शन समर्थपणे केले आहे.

६) दरिद्री आणि वैफल्याचे विदारक दर्शनही त्यांच्या कथांतून आढळते.

**समारोप,**

बी. रघुनाथांचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर मराठी कथेमध्ये महत्वपूर्ण स्थान आहे. त्यांनी नवकथेच्या वाटचालीमध्ये योगदान दिले आहे. कथेमध्ये जीवनदर्शनावर भर देऊन कथा तंत्राच्या बंदिस्तीपासून दूर ठेवली. शोषीतांचे जीवन कथेत मांडून ग्रामीण कथा जीवनवादी बनविली. सामाजिक वास्तवाचे जाण आणि भान असल्यामुळे सभोवती असणारे जीवनवास्तव समजून घेऊन सर्वसामान्य समाजवास्तव त्यांनी आपल्या कथेत मांडले. सरंजामीप्रवृत्ती, स्त्रीयांचे शोषन, ग्रामीण जीवनातील ताणे—बाणे, जीवनसंघर्ष, मराठवाडयातील समाजाचे अर्कचित्र, निजामी राजवटीतील अतिशय प्रतिकूल अशा सरंजामी वातावरणात जीवन जगत असलेल्या बी. रघुनाथांनी वास्तवचित्र कथेत मांडले. नागनाथ कोतापल्ले बी. रघुनाथांच्या कथेविषयी म्हणतात,“बी. नागनाथांची कथा साहित्यात अतिशय लक्षणीय आहे. त्यांची कथा वाचू लागली की, प्रथमतः एक गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे अनुभवाचे एक विस्तृत क्षेत्र त्यांच्या साहित्यात प्रगट झाले आहे व त्याबरोबरच त्यांच्या साहित्यातून प्रकट झालेली ही अनुभवसृष्टी समाजाच्या खालच्या स्तरावरती आहे.”[५] आपल्या जीवनाशी व अनुभवाशी अत्यंत प्रामाणिक राहून जीवनाबद्दलचे सखोल चिंतन प्रकट करणारी, जीवनाचा तळ शोधणारी बी. रघुनाथांची आधुनिक मराठी कथा साहित्यातील महत्वाचा टप्पा आहे. उणे पुरे ४० वर्षाचे आयुष्य लाभलेल्या या मराठवाडयातील कथाकाराला साहित्यविश्वात फार महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. “बी. रघुनाथांनी एक प्रकारे साहित्य दुर्गम भागात जीवन कुंठत असतांना, लौकिक जगण्याच्या सुखसोयीची किमान साधने उपलब्ध नसतांना, कारकूनी पेशात उभं आयुष्यं रखडावं लागलं असतांना, आजुबाजूची राजकीय परिस्थिती कमालीची प्रतिकूल आणि जाचक असतांना..... त्यांच्या निर्मितीला योग्य प्रतिसाद मिळत नसतांना जी अखंड साहित्यसाधना केली ती अपूर्वच म्हटली पाहिजे.....त्यांनी घडविलेल्या कथेची धारा मराठीच्या केंद्रवर्ती प्रवाहाला मिळाली असती तर तो अधिक जोमदार, निर्भय आणि नैसर्गिक उर्मीच्या आविष्काराने रसदार झाला असता.”[६] हे बी. रघुनाथंच्या कथेच्या संदर्भात म.द. हातकणंगलेकरांनी केलेले विधान म्हणजे—**‘एक श्रेष्ठ कथाकार’ म्हणून दिलेली पावतीच होय.**

**संदर्भग्रंथ—**

**१)** कोतापल्ले नागनाथ **साहित्याचा अन्वयार्थ,** मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे १९९६—पृष्ठ क्र.८८

**२)**संपादक भालेराव इंद्रजित व उमरीकर श्रीकांत, **समग्र बी. रघुनाथखंड दुसरा,** पृष्ठ क्र.४३४

**३)** देशमुख भगवंत, **बी. रघुनाथंच्या कथा,** मौज प्रकाशन, मुंबई—१९६५, पृष्ठ क्र.१३

४) संपादक भालेराव इंद्रजित, उमरीकर श्रीकांत, **‘बी रघुनाथ यांचे वाङ्मयः एक परिसंवाद’, समग्र बी. रघुनाथ**

प्रकल्प प्रकाशन, परभणी—१९९९, पृष्ठ क्र.११७

**५)** कोतापल्ले नागनाथ, **साहित्याचा अन्वयार्थ,** मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे—१९९६, पृष्ठ क्र.४५

**६)** हातकणंगलेकर म. द. **साहित्यविवेक,** प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९९७, पृष्ठ २०६.